# प्रधानमंत्री जन- धन योजना (PMJDY)
## नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

१. प्रधानमंत्री जन-धन योजना म्हणजे काय?

**उत्तर :** प्रधानमंत्री जन-धन योजना म्हणजे बँकिंग वित्तीय सेवा, उदाहरणार्थ बँकेचे व्यवहार, बचत आणि मुदत ठेव, पैसे पाठविणे, कर्ज, विमा, पेन्शन सुविहित स्वरुपात सहज उपलब्ध करणे. ही योजना राष्ट्रीय पातळीवर, आर्थिक व्यवहारात सर्वांचा सहज समावेश व्हावा यासाठी राबविलेली योजना आहे.

२. यापूर्वीच्या आर्थिक समावेशन योजना (स्वाभिमान) आणि प्रधानमंत्री जन-धन योजना यात कोणता फरक आहे?

**उत्तर :** प्रधानमंत्री जनधन योजना **(PMJDY)** प्रत्येक परिवाराचा या योजनेत समावेश करण्यावर भर देते. यापूर्वीची योजना खेड्यांचा विचार करीत होती. ही योजना ग्रामीण आणि शहरी भागाला समाविष्ट करीत आहे. यापूर्वीची योजना ज्या खेड्यांची लोकसंख्या २०००पेक्षा जास्त आहे त्याच खेड्यांना या स्वाभिमान योजनेचा लाभ होत होता.
पण पी.एम.जे.डी.वाय. या योजनेअंतर्गत १००० ते १५०० परिवार असलेल्या प्रत्येक उपसेवा क्षेत्रात बँकिंग सेवा उपलब्ध होऊन सारा देश या योजनेअंतर्गत गुंफला जाणार आहे. प्रत्येक पाच किलोमीटरच्या अंतरावर या सुविधा या योजनेसाठी संपूर्ण देशभर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

३. प्रधानमंत्री जन-धन योजने अंतर्गत संयुक्त खाते (जॉईंट अकाऊंट) उघडता येते काय ?

**उत्तर :** होय, बँकेच्या शाखातून संयुक्त खाते (जॉईंट अकाऊंट) उघडता येईल. व्यवसाय प्रतिनिधी (बँक मित्र) यांच्या माध्यमातून मात्र एकाच व्यक्तीला खाते उघडता येईल. (सिंगल अकाऊंट)

४. या योजने अंतर्गत मी कोठे खाते उघडू शकतो ?

**उत्तर :** बँकेच्या कोणत्याही शाखेत किंवा व्यवसाय प्रतिनिधी/ (बँक मित्र) मार्फत हे खाते उघडता येईल.

५. बी. अेस.बी.डी.अे. खाते म्हणजे काय?

**उत्तर :** बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट अकाऊंट (बी.अेस.बी.डी.अे) म्हणजे मूलभूत बचत बँक जमा खाते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दि. १०.८.२०१२ ला प्रसारित केलेल्या परिपत्राद्वारे या संदर्भात सविस्तर विवरण केले आहे. याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- खात्यात कमीतकमी शिल्लक रकमेची आवश्यकता नाही.
- बँकेतील या खात्यात रक्कम भरणे, रक्कम काढणे या बरोबरच एटीएम सेवा, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (इसीएस)भरणा आणि खात्याला खर्ची (डेबिट) टाकता येतील. तसेच या खात्यात चेक्स् भरता येतील व या खात्यातून चेक्स् द्वारा पेमेंट करता येईल.

* या खात्यातून दरमहा चार वेळा पैसे काढता येतील. यात एटीएम मधून काढलेल्या पैशांचाही समावेश आहे. हा नियम पैसे वा चेक्स यांचा भरणा करण्यासाठी लागू नाही.
* एटीएम कार्ड आणि एटीएम – कम– डेबिट कार्डची सुविधा.
* या सर्व सोईंसाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही.

६. बँकेत मूलभूत बचत बँक जमा खाते उघडण्यासाठी वय, उत्पन्न, खाते उघडताना भरावयाची रक्कम या बाबतीत काही निर्बंध आहेत का?

**उत्तर :** दहा वर्ष वयावरील कोणत्याही व्यक्तीस मूलभूत बचत बँक जमा खाते (बीएसबीडीए) उघडता येईल.

७. रूपे डेबिट कार्ड काय आहे?

**उत्तर :** रूपे डेबिट कार्ड हे नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) यांनी सुरु केलेले निवासी डेबिट कार्ड आहे. हे डेबिट कार्ड देशातील सर्व एटीएम केंद्रांवर (रोख रक्कम काढण्यासाठी) आणि पी.ओ.एस्. मशीन्सवर (रोख रक्कमेव्यतिरिक्त कोणत्याही खरेदीसाठी) चालू शकेल.

८. पी.आय.एन्. क्रमांक म्हणजे काय?

**उत्तर :** एटीएम कार्डाचा वापर करून खात्यातून रोख रक्कम काढण्यासाठी आणि पी.ओ.एस्. मशीन द्वारा काही खरेदी करताना खातेदाराने स्वत: निर्माण केलेला कोड नंबर म्हणजे व्यक्तिगत ओळख क्रमांक, पिन (पर्सनल आयडेन्टिफिकेशन नंबर).

९. आपले रूपे कार्ड कसे सुरक्षित ठेवाल?

**उत्तर :** रूपे कार्ड धारकाने आपले कार्ड सुरक्षित आणि व्यवस्थित ठिकाणी ठेवावे. (पिन) पी. आय. एन. अर्थात व्यक्तिगत ओळख क्रमांक हा सतत विशिष्ट कालवधीनंतर बदलत राहावा. हा क्रमांक कोणाशीही कोणत्याही परिस्थितीत उघड करु नये. (शेअर करू नये.) एटीएम किंवा पी.ओ.एस्. मशीनमध्ये रूपे कार्डाचा वापर करताना आपला पिन अतिशय गोपनीय पद्धतीने आणि कोणाही व्यक्तीला अंदाज करता येणार नाही अशा पद्धतीने वापरला जावा. अधिकृत जागा आणि अधिकृत केंद्रांवरच आपले कार्ड वापरले जावे. याशिवाय आपला पिन, कार्डावर चुकूनही लिहू नये.

१०. रूपे कार्डाचा विशेष फायदा कोणता?

**उत्तर :** रूपे कार्ड धारकाला कोणताही चार्ज न आकारता रु. १.०० लाख पर्यंतची (रु.एक लाख मात्र) अपघात विमा सुविधा उपलब्ध करण्यात येते.

११. अशिक्षित खातेदाराला रुपे कार्डाचा लाभ घेता येतो का ?

**उत्तर :** होय. परंतु अशिक्षित रूपे कार्ड धारकाला कार्ड देण्यापूर्वी शाखा व्यवस्थापकाने त्यातील सर्व संभाव्य अडचणी व धोके व्यवस्थित समाजवून सांगावेत.

१२. खातेदाराच्या बँकेतील खात्याशी खातेदाराचा मोबईल कसा जोडता येईल? (Link)

**उत्तर :** खातेदाराने खाते उघडताना भरून दिलेल्या फॉर्मवर जो खातेदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नंबर) नमूद केला असेल, तो कोअर बँक सिस्टिममध्ये त्याच्या खात्यात समाविष्ट केला जातो.विद्यमान खात्यातही खातेदाराच्या सूचनेवरून आणि बँक शाखेच्या परवानगीने भ्रमणध्वनी देऊन एटीएम, नोंदणी केलेल्या भ्रमणध्वनीवर एसएमएस द्वारा सूचना, नेट बँकिंग यासारख्या सेवांचा लाभ घेता येईल. (निरनिराळ्या बँकांमध्ये याचे स्वरूप निरनिराळे असू शकेल.)

१३. डेबिट कार्ड कार्यरत राहण्यासाठी काय करावे?

**उत्तर :** अपघात विमा संरक्षण फायदा उपलब्ध होण्यासाठी, आपल्या रुपे कार्डचा वापर ४५ दिवसातून एकदा तरी झाला पाहिजे.

१४. डेबिट कार्डची मुदत कधी संपते ? त्याचे नूतनीकरण कसे करता येते?

**उत्तर :** डेबिट कार्डची मुदत संपण्याची तारीख डेबिट कार्डवर नूमद केलेली असते. डेबिट कार्डची मुदत संपण्यापूर्वी आपल्या संबंधित शाखेला नवीन अर्ज देऊन आपल्याला डेबिट कार्डाचे नूतनीकरण करता येते.

१५. जर एखाद्या खातेदाराची दोन किंवा अधिक खाती असतील आणि दोन किंवा अधिक रूपे डेबिट कार्डस् असतील तर त्याला प्रत्येक खात्यावर आणि प्रत्येक रूपे डेबिट कार्डावर स्वतंत्र अपघात विमा मिळेल?

**उत्तर :** अपघात विमा संरक्षण फक्त एका खात्यावर एक लाख मिळेल. खात्यांची संख्या जास्त असेल तरी विमा एकाच खात्यावर मिळेल.

१६. 'पी. ओ. एस्.' म्हणजे काय?

**उत्तर :** पी.ओ.एस्. म्हणजे सेवेचे ठिकाण . पी. ओ. एस्. हे एक लहान मशीन असून सर्व व्यापारी केंद्रांवर ते बसविण्यात येणार आहे. या मशीनवर रोख रक्कम मिळवण्याव्यतिरिक्त इतर सेवा व्यवहार करता येतील.

१७. एखाद्या व्यक्तीचे कोणलाही बँकेत यापूर्वी खाते असेल तर अपघात विमा किंवा जीवन विमा याचे फायदे मिळावेत या उद्देशाने प्रधानमंत्री जन-धन योजने अंतर्गत खाते उघडण्याची आवश्यकता आहे काय?

**उत्तर :** एखाद्या व्यक्तीचे कोणत्याही बँकेत यापूर्वी खाते असेल तर प्रधानमंत्री जन-धन योजना अंतर्गत पुन: खाते उघडण्याची आवश्यकता नाही. खातेदाराने रूपे डेबिट कार्डसाठी अर्ज केल्यास त्यांना ते मिळू शकेल व त्यायोगे विमा संरक्षण मिळू शकेल. बचत खात्याचे व्यवहार समाधानकारक असल्यास त्या खात्यावर ओव्हरड्राफ्ट मिळण्याची सुविधा दिली जाईल. जीवनविम्याचा फायदा ज्या खातेदारांनी १६.८.२०१४ ते २५.१.२०१५ या मुदतीत प्रथमच खाते उघडले असेल त्यांनाच मिळेल.

१८. प्रधानमंत्री जन-धन योजने अंतर्गत रु. ५०००/ (रु. पाच हजार फक्त) पर्यंत रकमेचा ओव्हरड्राफ्ट दिला जातो, याच्या मागील हेतू स्पष्ट व्हावा तसेच ही सुविधा कोणास किती व कशा स्वरुपात उपलब्ध होऊ शकते?

**उत्तर :** पी.एम.जे.डी.वाय. या योजनेंतर्गत खाते उघडल्यानंतर खात्याचे व्यवहारांचा ६ महिन्यांचा समाधानकारक अनुभव पाहून ५०००/ रुपयांपर्यंतचा ओव्हरड्राफ्ट मंजूर केला जाईल. तो घरातल्या एका व्यक्तीला दिला जाईल. या संदर्भात एकाच कुटुंबात अधिक कर्जप्रकरणे होऊ नयेत यासाठी आधार कार्ड आवश्यक आहे. आधार कार्ड उपलब्ध नसेल तर बँक खातेदाराकडून त्यानुसार खबरदारी म्हणून खातेदाराचे प्रतिज्ञापत्र घेतले जाते.

१९. एका व्यक्तीची एका पेक्षा अधिक खाती असतील तर त्यानुसार त्याला ओव्हरड्राफ्ट उपलब्ध होतो ?

**उत्तर :** रु. ५०००/ पर्यंतची ओव्हरड्राफ्ट ची सुविधा ही कुटुंबातील एकाच व्यक्तीला उपलब्ध होऊ शकते. त्यातही कुटुंबातील महिलेला प्राधान्य दिले जाईल.

२०. ॲक्सिडेन्ट इन्शुरन्स कव्हर म्हणजे काय? या विम्याचा हप्ता कोण भरणार?

**उत्तर :** ॲक्सिडेन्ट इन्शुरन्स कव्हर रु. १.०० लाख(रु. एक लाख फक्त) असून खातेदाराला त्याचा हप्ता भरावा लागणार नाही. तो हप्ता एन.पी. सी. आय यांचेकडून भरला जाईल. आता हा प्रिमियम रु. ०.४७ (प्रत्येक कार्ड) असा आकारला जातो.

२१. प्रधानमंत्री जन-धन योजने अंतर्गत पती आणि पत्नी या दोघांनी स्वतंत्र खाती उघडली तर रु.१.०० लाखाचा ॲक्सिडेंटल इन्शुरन्स लाईफ इन्शुरन्स रु. ३००००/- आणि प्रत्येक खात्याला रु. ५०००/- चा स्वतंत्र ओव्हरड्राफ्ट (एकुण १०,०००) उपलब्ध होतो ?

**उत्तर :** अपघात विमा संरक्षण रु. १.०० लाख याचा लाभ प्रत्येक खात्याला मिळतो. परंतु यासाठी रु. ५०००/- पर्यंतची ओव्हरड्राफ्ट सुविधा ती पती आणि पत्नी दोघांपैकी कुटुंबातील एकाच व्यक्तीला मिळू शकेल. (घरातील गृहिणीला यात प्राधान्य दिले जाईल.) जीवनविमा कुटुंबप्रमुखाला मिळेल.

२२. प्रधानमंत्री जन-धन योजने अंतर्गत खाते उघडण्यासाठी कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते ?( कोणत्या कागदपत्रांची पूर्तता करावी ?)

उत्तर : i) आधारकार्ड/ आधार नंबर उपलब्ध असेल तर कोणत्याही इतर कागदपत्रांची आवश्यकता नाही. आधार कार्डवरचा पत्ता बदलला असेल तर त्या व्यक्तीचा जो सद्यस्थितीतला (वर्तमानातला) पत्ता असेल तो त्यांनी स्वत: प्रमाणित (सर्टिफिकेशन) करुन दिला तरी खाते उघडताना तो स्वीकारला जाईल.

ii) जर आधार कार्ड नसेल तर खालीलपैकी कोणतीही अधिकृत सरकारी वैध कागदपत्रे चालू शकतील. मतदार ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (driving Licence) पॅन कार्ड, पासपोर्ट(पारपत्र) नरेगा कार्ड, या कागदपत्रांवर तुमचा पत्ता असेल तर 'ओळख आणि पत्त्याचा पुरावा' यासाठी ते ग्राह्य धरले जाईल.

iii) खाते उघडायला येणाऱ्या व्यक्तीकडे वर उल्लेख केलेल्या अधिकृत/ सरकारी वैध कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र नसतील, पण हे खाते बँकेच्या दृष्टीने 'कमी जोखीम' या वर्गात मोडणारे असेल तर खाली उल्लेख केलेल्या बाबींची पूर्तता करुनही पी.अेम.जे. डी. वाय. योजनेखाली खाते उघडता येईल.

अ) केंद्र आणि राज्य सरकारचे विभाग, सांविधिक आणि नियमक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शेड्यूल बँक, सार्वजनिक आर्थिक संस्था यांनी वितरित केलेले छायाचित्र असलेले ओळखपत्र

ब) गॅझेटेड ऑफीसरने वितरित केलेले पत्र आणि खाते उघडणाऱ्या व्यक्तीचा सत्त्यापित फोटो (सत्यप्रतस्वाक्षरी).

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दि. २६.८.२०१४ च्या प्रसिद्धी पत्रकात जे स्पष्टीकरण दिलेले आहे त्यानुसार-

'ज्या व्यक्तीकडे कोणत्याही स्वरूपाचे अधिकृत वैध दस्तऐवज नसतील ती व्यक्ती बँकेकडे ''स्मॉल अकाऊंट'' (लघु खाते) उघडू शकते. आपली स्वत:ची सही करून सत्त्यापित केलेला फोटो आणि बँकेच्या अधिकाऱ्यासमोर केलेली सही किंवा डाव्या आंगठ्याचा ठसा करुन 'स्मॉल अकाऊंट' उघडता येते.''स्मॉल अकाऊंट'' (लघु खाते) ला काही मर्यादा घालून दिलेल्या आहेत. (वर्षभराच्या कालावधीत रु.१.०० लाख पेक्षा आधिक रक्कम जमा करता येणार नाही. ) एकत्रित पैसे काढण्यावर मर्यादा आहेत. (महिन्यात दहा हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम खात्यातून काढता येणार नाही) या खात्यात कमीत कमी शिल्लक रकमेबाबतही काही मर्यादा आहेत. (खात्यात कधीही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम शिल्लक नसावी.) लघु खाते उघडल्यापासून असे खाते बारा महिने वैध राहील. या कालवधीनंतर खातेदाराने कोणतेही अधिकृत वैध दस्तऐवज मिळवण्यासाठी प्रयत्न करीत असलेला पुरावा सादर केल्यास त्यानंतर पुढील बारा महिने लघु खाते सुरु ठेवण्याची परवानगी दिली जाईल.

२३. एखाद्या व्यक्तिचा सद्यस्थितीतला नमूद केलेला निवासी पत्ता त्याच्या आधार कार्डावरील पत्त्यापेक्षा वेगळा असेल तर आधार कार्डाच्या आधारे प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत खाते उघडता येईल?

उत्तर : जर पत्ता बदलला असेल तर स्वत:च्या सहीने प्रमाणित केलेला सध्याचा पत्ता पुरेसा आहे.

२४. प्रधान मंत्री यांनी आपल्या २८.८.२०१४ च्या भाषणात उल्लेख केलेल्या रु.३०,०००/- च्या विम्याच्या योजनेचा अर्थ काय?

उत्तर : प्रधान मंत्री यांनी आपल्या २८.८.२०१४ च्या भाषणात उल्लेख केलेल्या या योजेनेच्या अंमलबजावणीसाठी त्यातील गोष्टी लवकरात लवकर सविस्तर स्पष्ट केल्या जातील.

२५. प्रधान मंत्री जन-धन योजनेअंतर्गत उघडल्या गेलेल्या खात्याच्या खातेदाराला चेकबुकची (धनादेश पुस्तक) सुविधा उपलब्ध होते का?

उत्तर : पी.एम.जे. डी.वाय या योजनेखाली शून्य शिलकीने खाते उघडता येते. परंतु खातेदाराला चेक बुक हवे असेल तर त्या संदर्भात आवश्यक कमीत कमी शिल्लक रकमेची पूर्तता करूनच चेकबुक (धनादेश पुस्तक) मिळू शकेल.

२६. पी. एम.जे.डी.वाय. योजने अंतर्गत खाते उघडलेल्या खातेदारांना कोणत्या स्वरुपाचे थेट/ विशेष लाभ मिळू शकतात?

उत्तर : या योजनेचे लाभ खालीलप्रमाणे आहेत.

i) जमा रकमेवर व्याज
ii) रू.१.०० लाखाचे अपघात विमा संरक्षण
iii) कमीत कमी शिल्लक रकमेची आवश्यकता नाही. परंतु अेटीएम रुपे डेबिट कार्ड यांच्या वापरासाठी अशी कार्डे वितरित केलेली असतील तर खात्यात काही शिल्लक रक्कम ठेवणे अनिवार्य आहे.
iv) रु. ३०,०००/ जीवन विमा संरक्षण
v) संपूर्ण भारतभर पैशाचे सुलभ हस्तांतर
vi) सरकारी योजनांमधील लाभार्थींना त्यांच्या खात्यात त्यांचा अर्थलाभ थेट उपलब्ध होऊ शकेल.
vii) या खात्याचे व्यवहार सहा महिने समाधानकारक असतील तर ओव्हरड्राफ्टची सवलत मिळू शकेल.
viii) पेन्शन, विम्याच्या विविध उत्पादनांचा लाभ.

२७. माझ्याकडे खाते उघडण्यासाठी आवश्यक असणारे कोणतेही वैध कागदपत्र उपलब्ध नसतील तरीही मी प्रधानमंत्री जन-धन योजनेंतर्गत खाते उघडू शकतो?

उत्तर : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेमार्फत दि. २६.८.२०१४ रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे त्यानुसार-
'ज्या व्यक्तीकडे कोणत्याही स्वरूपाचे अधिकृत वैध दस्तऐवज नसतील ती व्यक्ती बँकेकडे ''स्मॉल अकाऊंट'' (लघु खाते) उघडू शकते. आपली स्वत:ची सही करून सत्त्यापित केलेला फोटो आणि बँकेच्या अधिकाऱ्यासमोर केलेली सही किंवा डाव्या आंगठ्याचा ठसा करुन 'स्मॉल अकाऊंट' उघडता येते.''स्मॉल अकाऊंट'' (लघु खाते) ला काही मर्यादा घालून दिलेल्या आहेत. (वर्षभराच्या कालावधीत रु.१.०० लाख पेक्षा आधिक रक्कम जमा करता येणार नाही. ) एकत्रित पैसे काढण्यावर मर्यादा आहेत. (महिन्यात दहा हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम खात्यातून काढता येणार नाही) या खात्यात कमीत कमी शिल्लक रकमेबाबतही काही मर्यादा आहेत. (खात्यात कधीही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम शिल्लक नसावी.) लघु खाते उघडल्यापासून असे खाते बारा महिने वैध राहील. या कालवधीनंतर खातेदाराने कोणतेही अधिकृत वैध दस्तऐवज मिळवण्यासाठी प्रयत्न करीत असलेला पुरावा सादर केल्यास त्यानंतर पुढील बारा महिने लघु खाते सुरु ठेवण्याची परवानगी दिली जाईल.

२८. पी.अेम.जे.डी.वाय. योजने अंतर्गत उघडल्या गेलेल्या खात्यावर किती टक्के व्याज मिळू शकते?

**उत्तर :** बचत खात्याला लागू असलेले व्याजदर (सध्या @4%) पी.एम.जे.डी.वाय. खात्याला लागू आहेत.

२९. पी.अेम.जे.डी.वाय. योजने अंतर्गत उघडल्या गेलेल्या खात्यावर दिल्या जाणाऱ्या ओव्हरड्राफ्टवर किती टक्के व्याज आकारले जाते?

**उत्तर :** आधार दर + २ % किंवा १२% यातील कमीत कमी असलेला व्याज दर. सध्या हा दर १२% आहे.

३०. पी.अेम.जे.डी.वाय. योजने अंतर्गत उघडण्यात येणाऱ्या खात्यासाठी भविष्यात बँकेकडून काही विशेष शिबिरे (कॅम्पस्) आयोजित केली जाणार आहेत का?

**उत्तर :** होय. सर्व राष्ट्रीकृत बँकांना सर्व शनिवारी सकाळी ८ ते रात्री ८ या वेळात अशी शिबीरे संघटित करण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. बँकांनी याशिवाय इतर दिवशीही शिबिरांचे आयोजन केल्यास तशी त्यांना मुभा देण्यात आली आहे.

३१. 'आधार कार्ड' मिळवण्यासाठी सर्व कागदपत्रांची मी पूर्तता केली तर बँकेच्या शाखेतच मला आधार कार्ड मिळू शकेल का? ज्या आधार कार्डाच्या सहाय्याने पी.अेम.जे.डी.वाय. अंतर्गत मी त्या बँकेतच खाते उघडू शकेन.

**उत्तर :** यूआयडीअेआय यांचेवतीने आयोजित शिबिरांमध्ये आधार कार्ड मिळू शकेल. तसेच पी.अेम.जे.डी.वाय. यासाठी बँकेकडून जी शिबिरे आयोजित केली जातील, तेथेही आधार कार्ड उपलब्ध होऊ शकेल व खातेही उघडता येईल.

३२. पी.अेम.जे.डी.वाय.अंतर्गत खाते उघडताना त्यासाठी बँकेला मला काही 'फी' देण्याची आवश्यकता असते काय?

**उत्तर :** नाही. प्रधानमंत्री जन-धन योजने अंतर्गत बँकेत खाते उघडताना कोणतीही फी किंवा कोणत्याही स्वरुपाचे चार्जेस घेतले जात नाहीत.

३३. पी.अेम.जे.डी.वाय. अंतर्गत अज्ञान (१८ वर्षाखालील ) व्यक्तीला खाते उघडता येते का?

**उत्तर :** ज्या व्यक्तीच्या वयाची १० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा कोणत्याही व्यक्तीस पी.अेम.जे.डी.वाय. अंतर्गत खाते उघडता येते.

३४. प्रधान मंत्री जन-धन योजनेत व्यवसाय प्रतिनिधी / बँक मित्र कोण आणि त्यांची भूमिका कोणती?

**उत्तर :** बँकेची शाखा वा अेटीएम दोन्ही ज्या ठिकाणी किफायतशीर नसते त्याठिकाणी बँक व्यवसाय प्रतिनिधी / बँक मित्र या एजंटाची नेमणूक केली जाते. बँक व्यवसाय प्रतिनिधी / बँक मित्र यांच्या कामाची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे.

१) बचत खाते तसेच बँकेतील इतर उत्पादनासंदर्भात माहिती देऊन त्या बद्दल संभाव्य खातेदाराला शिक्षित करुन पैशाच्या गुंतवणुकीबद्दल आणि कर्जे यासंबंधी योग्य सल्ला देणे.

२) संभाव्य खातेदारांचा शोध.

३) पैसे जमा करण्याचे निरनिराळे फॉर्मस् एकत्र करून त्यासंदर्भातली प्राथमिक माहिती देऊन त्याची तपासणी करण्यासंदर्भात माहिती देणे.

४) खाते उघडण्याचा फॉर्म संपूर्ण भरण्यासंदर्भातले मार्गदर्शन.

५) छोट्या रकमा जमा करून घेणे आणि पैसे काढणाऱ्यांना पैसे देणे.

६) छोट्या रकमेची स्वीकृती आणि सूचनेनुसार ती रक्कम पाठविणे तसेच सूचनेनुसार अन्य पैशांचे व्यवहार करणे.

७) लघु खात्याच्या व्यवहारांचे विवरण देणे, इतर खात्यांची विचारणा केल्यानुसार माहिती पुरविणे.

८) बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या अनुमतीने, त्याच्या वतीने अन्य सेवा पुरविणे.

३५. बँकेच्या सेवांची माहिती घेऊन त्या सेवा घेताना बँक मित्र कशा पद्धतीने मार्गदर्शन करून उपयोगी पडतो?

**उत्तर :** ज्या भागात बँकेची शाखा उघडणे काही कारणपरत्वे शक्य नसेल वा किफायतशीर नसेल त्या ठिकाणी बँक मित्र मर्यादित स्वरुपाच्या सेवा उपलब्ध करून देऊ शकतो. याप्रमाणे बँकेच्या व्यावसायिक धोरणांची पूर्तता करून आर्थिक व्यवहारात अधिकाधिक प्रमाणात समाजातील सर्व थरांचा समावेश करण्याचा प्रयत्न करतो; त्यानुसार मार्गदर्शन करतो.

३६. बँक मित्र कोण होऊ शकतो?

**उत्तर :** बँक व्यवसाय प्रतिनिधी/ बँक मित्र म्हणून बँकेने खाली नमूद केलेल्या घटकांचा समावेश केलेला आहे-

१) निवृत्त बँक कर्मचारी

२) निवृत्त शिक्षक

३) निवृत्त सरकारी कर्मचारी

४) माजी सैनिक

५) किराणा माल विक्रेते, औषध विक्रेते, स्वस्त धान्याची दुकाने, वैयक्तिक सार्वजनिक दूरध्वनी केंद्रे, सरकारी स्मॉल सेव्हिंग्ज स्कीम राबविणारे एजंटस्/ विमा प्रतिनिधी

६) भारतीय कंपनी कायदा नुसार नोंदणीकृत 'लाभ अर्जित' करणाऱ्या कंपन्या.
रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २४.६.२०१४ पासून NBFC (नॉन बँकिंग फिनान्शियल कंपनीज्) यांनाही रोखीच्या व्यवहारा व्यतिरिक्त इतर व्यवहारांची परवानगी दिलेली आहे.

३७. बँकेच्या एका शाखेत पी. एम. जे.डी.वाय अंतर्गत उघडलेले खाते दुसऱ्या शहरात वा राज्यात ट्रान्सफर (वर्ग) होऊ शकते का?

**उत्तर :** पी.एम.जे.डी.वाय खाते ज्या बँकांमधून उघडले जाणार आहे त्या बँका कोअर बँकिंगवर (सी.बी.एस) काम करीत असल्यामुळे खातेदाराचे खाते बँकेच्या कोणत्याही शहरात/ गावात सुलभरित्या वर्ग करता येईल.

३८. यू .एस.एस.डी. बेस्ड व्यवहार म्हणजे काय? त्याचा वापर कसा करावा ?

**उत्तर :** यू.एस.एस.डी.हे 'अनस्ट्रक्चर्ड सप्लिमेंटरी सर्व्हिस डाटा' याचे संक्षिप्त रूप आहे.

यू .एस.एस.डी. बेस्ड मोबाईल बँकिंग सेवा निरनिराळ्या बँकिंग सेवा उपलब्ध करून देऊ शकते. त्यात पैसे वर्ग (ट्रान्सफर) करणे, बिलांचे पेमेंट, शिल्लक रकमेची चौकशी, मर्चंट पेमेंटस् या सारख्या व्यवहारांचा समावेश करता येईल. हे व्यवहार आपल्या सर्वसाधारण जीअेसअेम आधारित भ्रमणध्वनीवर (मोबाईलवर) करता येतील. यासाठी इमिजिएट पेमेंट सर्व्हिस (आयएमपीअेस्) साठी आवश्यक कोणत्याही प्रकारे वेगळे डाऊन लोड करण्याची आवश्यकता नाही. मोबाईल धारणकर्त्याचा मोबाईल नंबर त्याचे खाते असलेल्या बँकेत नोंदविलेला असण्याची आवश्यकता आहे. बँक मोबाईल सेवा वापरणाऱ्या व्यक्तीस एक एम-पिन (मोबाईल पिन) देईल. त्याचा वापर करून मोबाईल सेवा वापरणारी व्यक्ती *९९# हा क्रमांक डायल करून हवा असलेला मेनू निवडून 'यू.एस.एस.डी.' सेवेचा लाभ घेऊ शकेल. यानंतर खातेदार मेनू मधून निवडलेल्या व्यवहारांसाठी सूचनांनुसार पालन करून व्यवहार पूर्ण करू शकेल. या व्यवहारासाठी टेलिकॉम ऑपरेटर्सचे नाममात्र शुल्क भरावे लागेल. (ट्रायच्या नियमानुसार प्रत्येक व्यवहारासाठी १.५० पैसे शुल्क आकारले जाईल.)

* * *